कला अकादमी गोवा
कांपाल-पणजी
कअ/काविवि/भ.स्प/२०२४-२५/५७७
दि. २१/०६/२०२४

## कृपया प्रसिध्दीसाठी

गोवा कला अकादमी आयोजित पं.मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती पुरुष, महिला व बाल कलाकार भजन स्पर्धेला जुलै महिन्याच्या पहिल्या आठवडयापासून प्रारंभ होत आहे. दरवर्षी ही भजनस्पर्धा विभागीय स्तरावर गोव्याच्या विविध ग्रामीण भागात आयोजित करण्यात येते. या स्पर्धेचे एक केंद्र हे दोन सत्रातून दोन दिवस एकाच ठिकाणी आयोजित केले जाणार आहे.

त्यादृष्टीने या स्पर्धेचे एखादे केंद्र आपल्या गावात आयोजित करण्यास इच्छुक असलेल्या स्वयंसेवी संस्था, सांस्कृतिक मंडळे अथवा देवस्थान समित्यांनी आपले लेखी अर्ज सदस्य सचिव, कला अकादमी गोवा, आदिलशाह पॅलेस, जुने सचिवालय, पणजी-गोवा ४०३००१ या पत्त्यावर आपला संपूर्ण पत्ता व संपर्कासाठी भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करून दि. २७ जून २०२४ पर्यंत पाठवावेत.

स्पर्धेच्या स्थानिक आयोजनाची जबाबदारी सदर संस्थांनी घ्यावी तर उर्वरित सर्व व्यवस्था (उदा. पथकांची निवड, परिक्षक, ध्वनियंत्रणा व प्रकाशयोजना) कला अकादमीतर्फे करण्यात येईल. ज्या मंदिर किंवा सभागृहांसाठी प्रसाधनगृहाबरोबरच पुरेशी गाड्या पार्किंगची व्यवस्था असेल अशा मध्यवर्ती ठिकाणांचाच प्राधान्यक्रमाने विचार करण्यात येईल. भजनस्पर्धेचा केंद्रवार कार्यक्रम ठरविताना आयोजनातील सुलभताही लक्षात घेऊन कला अकादमीतर्फे अशा अर्जांचा विचार करण्यात येईल याची संबंधित संस्थांनी नोंद घ्यावी.

(श्री. संजीव ना. झर्मेकर)
कार्यक्रम अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता,
८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड/एसएस